सुविचार

कधीकधी अगदी छोटे निणर्य पण आपल्या जीवनात कायमस्वरूपी बदल घडवतात.

साप्ताहिक

# अधिकारनामा

Email : adhikarnama2021@ gmail.com

Web : www.adhikarnama.in

'अधिकारनामा' या साप्ताहिक साठी जिल्हा आणि तालुका प्रतिनिधी नियुक्त करायचे आहेत. इच्छुकांनी संपर्क करावा. मो. 9665382780, 9766382780

मुख्य संपादक : निलेश बा. किरतकार मो. ९६६५३८२७८०, ९७६६३८२७८० ○ कार्यालय : साप्ताहिक अधिकारनामा, गाडगे नगर, अमरावती – ४४४६०३

अकोला * बुधवार दि. १० ऑगस्ट २०२२ * वर्ष २ रे * अंक ०८ * किंमत २ रुपये * RNI Title Code No. : MAHMAR50842


## शिंदे गटातील आमदारांची नाराजी; मंत्रिमंडळ विस्तारात नाव नसल्यानं अपेक्षाभंग

साप्ता. अधिकारनामा

**मुंबई** : राज्यात एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारल्यानंतर जवळपास ५० आमदारांनी त्यांना साथ देत मविआविरोधात भूमिका घेतली. ५० आमदारांमुळे ठाकरे सरकार अल्पमतात आले. बहुमतचाचणी आधीच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला. त्यानंतर महाराष्ट्रात भाजपाच्या पाठिंब्यावर मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतली आणि उपमुख्यमंत्री म्हणून अनपेक्षितपणे देवेंद्र फडणवीसांना शपथ घ्यावी लागली. ३० जून रोजी मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा शपथविधी पार पडल्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागलं होते. अखेर ९ ऑगस्ट रोजी मंत्रिमंडळ विस्ताराचा पहिला टप्पा पार पडत आहे. या विस्तारात भाजपाकडून ९ आणि शिंदे गटाकडून ९ जणांना संधी देण्यात आली आहे. परंतु शिंदे गटात मंत्रिपदाची अपेक्षा असणाऱ्या जास्त संख्या असल्याने पहिल्या टप्प्यात विस्तारात संधी न मिळाल्यानं अनेकजण नाराज आहेत.

भाजपा-शिवसेनेसोबत सरकारमध्ये अपक्ष, मित्रपक्षांनीही साथ दिली. मात्र पहिल्या विस्तारात अपक्षांना संधी देण्यात आली नाही. त्याबद्दल मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊ. दिव्यांग कल्याण मंत्रालय, रोजगार हमी विभाग यासाठी आम्ही आग्रही आहोत. मंत्रिपदाचा आमचा हक्क, अधिकार आहे ते आम्ही मिळवू. सामान्य माणसांचे विषय मार्गी लागावेत याला प्राधान्य आहे. मित्रपक्ष, अपक्षांशिवाय सरकार राहू शकत नाही. राजकारणात गोपनीयता ठेवावी लागते. आम्हाला शब्द दिला आहे. आता काही पावलं मागे घेतली आहे. शब्दाला ठाम राहावं असं कडू यांनी म्हटलं आहे. शिंदे गटातून संजय




शिरसाट, भरत गोगावले, बच्चू कडू यांची नावं वगळण्यात आली आहेत. त्यामुळे आमदार नाराज असल्याची चर्चा आहे. शिंदे गटाकडून पहिल्या टप्प्यात शंभुराज देसाई, गुलाबराव पाटील, तानाजी सावंत, दीपक केसरकर, संदीपान भुमरे, अब्दुल सत्तार, दादा भुसे, उदय सामंत, संजय राठोड यांना संधी देण्यात आली आहे. तर भाजपाकडून गिरीश महाजन, चंद्रकांत पाटील, मंगलप्रभात लोढा, राधाकृष्ण विखे पाटील, रवींद्र चव्हाण, सुरेश खाडे, सुधीर मुनगंटीवार, अतुल सावे, विजयकुमार गावित यांना संधी देण्यात आली आहे.

## आम्ही मंत्री आहोत, त्यामुळे कायदा तोडण्याचा अधिकार आहे - नितीन गडकरी

साप्ता. अधिकारनामा

**नागपूर** : गरिबांचे कल्याण करण्यासाठी कोणताच कायदा आडवा येणार नाही. त्यासाठी १० वेळा कायदा तोडावा लागला तरी चालेल, तो तोडला पाहिजे असे महात्मा गांधींनी यांनी सांगितले होते. त्यामुळे लोकांच्या हितासाठी कायदा तोडण्याचा आमचा अधिकार आहे. आम्ही मंत्री आहोत, त्यामुळे कायदा तोडण्याचा अधिकार आहे, असे वक्तव्य केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे. महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सच्या नागपूर शाखेकडून मल्टी डिस्प्लेनरी मल्टी मॉडेल रिझल्टच्या अंतर्गत आदिवासींच्या आरोग्याकरिता ब्लॉसम नावाच्या प्रकल्पाचे नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी सरकार अधिकाऱ्यांच्या मताने नाही तर आमच्या मताने चालेल. आम्ही जसे म्हणू त्याला अधिकाऱ्यांनी 'यस सर' म्हणत अंमलबजावणी केली पाहिजे, असे नितीन गडकरी म्हणाले. १९९५ मध्ये राज्यात मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना गडचिरोली आणि मेळघाट मध्ये २ हजार आदिवासी बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू झाल्याची महितींसमोर आली होती. त्यावेळी त्या भागात ४५० गावांना रस्ते नव्हते आणि रस्ते बांधण्यासाठी वन विभागाचे कायदे अडसर ठरत होते. रस्ते नसल्याने विकास होत नव्हता. त्यावेळी मी माझ्या पद्धतीने ती समस्या सोडविली होती, असे नितीन गडकरी सांगितले.



गरिबांचे कल्याण करण्यासाठी कोणताच कायदा आडवा येणार नाही. त्यासाठी १० वेळा कायदा तोडावा लागला तरी चालेल, तो तोडला पाहिजे असे महात्मा गांधींनी यांनी सांगितले होते. त्यामुळे लोकांच्या हितासाठी कायदा तोडण्याचा आमचा अधिकार आहे. आम्ही मंत्री आहोत, त्यामुळे कायदा तोडण्याचा अधिकार आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, तुम्ही म्हणाल तसे सरकार चालणार नाही. तर सरकार आम्ही म्हणू तसे चालेल. तुम्ही फक्त 'यस सर' म्हणायचे आणि आम्ही दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करायची, असे म्हणत नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना यावेळी सुनावले.

## 'हर घर तिरंगा'; नागपुरात 2 लाख विद्यार्थींना झेंड्याचे वाटप

साप्ता. अधिकारनामा

**नागपूर** : नागपूर महानगरपालिकेतर्फे स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या निर्देशानुसार संपूर्ण नागपूर शहरामध्ये 'हर घर तिरंगा' अभियान १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये उत्साहात राबविण्यात येणार आहे. या अभियानाद्वारे आतापर्यंत नागपूर शहरातील विविध शाळांमध्ये २ लाख विद्यार्थ्यांना तिरंगा झेंडा वाटप करण्यात आला आहे. नागपूर शहरातील १३० महानगरपालिकेच्या शाळांतील १५ हजार विद्यार्थींचा यात समावेश आहे. अभियानासाठी, प्रशासनातर्फे २३ केंद्रीय शाळा पथकाद्वारे तिरंगा वाटप केला जात आहे. या अभियानाद्वारे नागपूर शहरातील सुमारे ६ लाख घरांवर तिरंगा फडकाविण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात



आले असून, यासाठी केंद्रीय शाळा पथकाद्वारे शाळांमध्ये जाऊन, विद्यार्थ्यांना तिरंगा वाटप केले जात आहे. नागपूर शहरातील मनपा शाळा, खाजगी शाळांचे ४ लाख विद्यार्थी 'हर घर तिरंगा' अभियानात सहभागी होणार आहेत, तसेच नागरिकांना मनपाद्वारे स्वस्त दरात झेंडा उपलब्ध करून दिला जात आहे. 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत शहरातील प्रमुख ७५ चौकांत, रोशनाईसुद्धा करण्यात आली आहे. शहरातील सर्व शाळांमध्ये तिरंगा वाटपाचा कार्यक्रम सुरू आहे.

## हे 'व्हाईट वॉश' मंत्रिमंडळ आहे का ? यशोमती ठाकूर यांचा खोचक प्रश्न

साप्ता. अधिकारनामा

**अमरावती** : राज्यातील मंत्रिमंडळ विस्तारात महिलांना जाणीवपूर्वक डावलले गेल्याकडे लक्ष वेधतानाच शिंदे-फडणवीस सरकारचे हे 'व्हाईट वॉश' मंत्रिमंडळ आहे का ? असा खोचक प्रश्न काँग्रेसच्या नेत्या आणि माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी केला आहे. ९ ऑगस्ट क्रांतिदिनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आजादी गौरव पद यात्रेनिमिताने आयोजित कार्यक्रमात त्यांनी माध्यमाशी बोलताना ही प्रतिक्रिया व्यक्त केली. राज्य मंत्रिमंडळ विस्तार म्हणजे एखादा विनोद व्हावा अशी कृती दिसत असल्याचे ॲड. यशोमती ठाकूर



यांनी सांगितले. एकाही महिलेला मंत्रिपदी संधी दिली नाही, हे आश्चर्य आहे, तर भाजप नावाची वॉशिंग पावडर चारित्र्य साफ करत असल्याने हे शिंदे-फडणवीस सरकारचे हे 'व्हाईट वॉश' मंत्री मंडळ आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. शिवाय आमदार संजय राठोड यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्याने आता भाजपच्या चित्रा वाघ यांची भूमिका काय असेल याकडेही लक्ष वेधले आहे.

## सेंट्रल बँकेचे एटीएम फोडून ७ लाख लंपास

साप्ता. अधिकारनामा

**खेडशिवापूर** : वेळू येथील पुणे सातारा महामार्गानजीकच्या असलेल्या सेंट्रल बँकेचे 'एटीएम' मशिन गॅस कटरच्या सहाय्याने कापून त्यातील ७ लाख ९६ हजारांची रोकड चोरट्यांकडून लंपास केली आहे. मंगळवारी पहाटे ४ ते ५ च्या दरम्यान ही चोरीची घटना घडली असून अज्ञात चोरट्यांच्या विरोधात राजगड पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वेळू येथील सेंट्रल बँक ऑफ इंडिया बँकेच्या बाहेर काही वर्षांपासून बँकेचे एटीएम मशिन आहे. ९ ऑगस्टला पहाटे च्या सुमारास चोरट्यांनी गॅस कटरच्या सहाय्याने 'एटीएम' कापून त्यातील ७ लाख ९६ हजार रुपये चोरून पोबारा केला. ही चोरी झाल्याचे लक्षात येताच, पोलिसांना कळविल्यानंतर राजगडचे पोलीस निरीक्षक सचिन पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज कुमार नवसरे, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत जोशी, व त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. व माहिती घेतली चोरांचा माग काढण्यासाठी




श्वानाला ही पाचारण करण्यात आले होते. त्याने ससेवाडी गावच्या हद्दीपर्यंतचा मार्ग दाखवला असून तपासासाठी राजगड पोलिसांनी दोन पथक तयार केली असल्याची माहिती राजगड पोलिसानच्या वतीने देण्यात आली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक शेळके यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. पुढील तपास पो उप निरीक्षक श्रीकांत जोशी हे करत आहेत. बँकेने आपल्या बँकेच्या परिसरामध्ये चांगल्या दर्जाचे सीसीटीव्ही व लाईट लावणे आवश्यक आहे त्याचबरोबर बँकेच्या बाहेर सुरक्षारक्षक असणेही गरजेचे आहे यासंदर्भात चा पत्रव्यवहार सदर बँकेशी करण्यात आला होता मात्र संबंधित सूचनाकडे बँकेने दुर्लक्ष केले असल्याची माहिती राजगड चे पो निरीक्षक सचिन पाटील यांनी दिली.

## पुढच्या मंत्रीमंडळ विस्ताराचाही मुहूर्त ठरला!

### मित्रपक्ष आणि अपक्षांची नाराजी दूर होणार का?

साप्ता. अधिकारनामा

**मुंबई** : शिंदे-फडणवीस सरकारचा पहिला मंत्रीमंडळ विस्तार मंगळवारी पार पडल्यानंतर त्यावर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. सरकारमधील सहभागी मित्रपक्ष आणि अपक्षांमध्ये नाराजी असल्याची चर्चा सध्या सुरू झाली आहे. ज्या अपक्षांना मंत्रिमंडळात स्थान मिळालं नाही, ते नाराज असल्याचं सांगितलं जात असतानाच 'प्रहार' संघटनेचे बच्चू कडू यांनी सूचक शब्दांत अप्रत्यक्षपणे आपली नाराजी बोलून दाखवली होती. मात्र, युतीमध्ये कुणीही नाराज नसून पुढच्या मंत्रीमंडळ विस्तारामध्ये सर्वांना समावून घेतलं जाईल, असं सरकारमधील मंत्री सांगत आहेत. या पार्श्वभूमीवर नेमका पुढचा मंत्रीमंडळ विस्तार कधी होणार? याविषयी तर्क-वितर्क लावले जात असतानाच सरकारमधील मंत्र्यांकडूनच यासंदर्भात सूतोवाच करण्यात आले आहेत. राज्य मंत्रीमंडळ विस्तारानंतर आज एकूण १८ आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यामध्ये भाजपाचे ९ तर शिंदे गटाच्या ९ आमदारांचा समावेश आहे. मात्र, या




विस्तारामध्ये युतीमधील इतर अपक्ष आणि मित्रपक्षांना सहभागी करून घेण्यात आलं नसल्यामुळे नाराजीची चर्चा सुरू झाली होती. त्यासंदर्भात प्रतिक्रिया देताना बच्चू कडू यांनी अपक्ष आणि मित्रपक्षांना पहिल्या विस्तारात सहभागी करून घेतलं जाईल, अशी अपेक्षा होती, असं म्हटलं आहे.

"बच्चू कडू स्वतःसाठी कधीच नाराज होणार नाही. पण दिव्यांग आणि शेतकऱ्यांसाठी नाराज झाल्याशिवाय राहणार नाही. आम्हाला सांगितलं आहे की सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुढचा मंत्रीमंडळ विस्तार होईल. तेव्हा तुम्हाला संधी देऊ", असंही बच्चू कडू म्हणाले होते. दरम्यान, या सर्व चर्चांवर आज मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर उदय सामंत यांनी पुढील मंत्रीमंडळ विस्तारामध्ये सर्वांना सहभागी करून घेतलं जाईल, असं म्हटलं आहे. "आज फक्त १८ मंत्र्यांनी शपथ घेतली आहे. ४२ पैकी १८ मंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर उरलेल्या मंत्रीपदांवर सगळ्यांना प्रतिनिधित्व दिलं जाणार आहे. ज्या शंका सध्या निर्माण केल्या जात आहेत, त्या प्रत्येक शंकेचं निरसन त्या मंत्रीमंडळ विस्तारामध्ये होईल. हा मंत्रीमंडळ विस्तार अधिवेशनानंतर तात्काळ होईल", असं उदय सामंत म्हणाले आहेत. येत्या १७ ऑगस्टपासून विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरू होत असून त्यानंतर होणारा मंत्रीमंडळ विस्तार बच्चू कडू यांनी सांगितल्याप्रमाणे सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

## पुलाअभावी नदीच्या पाण्यातून काढावी लागली अंत्ययात्रा



साप्ता. अधिकारनामा

**सोलापूर** : जिल्ह्याच्या अक्कलकोट तालुक्यातील हरणा नदीला सध्या पूर आला आहे. नदी तुडुंब भरून वाहत असल्याने नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांचं जनजीवन विस्कळीत झालं आहे. पितापूर आणि आकांतळा या दोन गावांना जोडणाऱ्या पुलाची उंची खूपच कमी असल्याने हा पूल पाण्याखाली गेला आहे. अशा स्थितीत परिसरातील नागरिक जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत. दरम्यान याठिकाणी एक हृदय पिळवटून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. येथील एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्यांची अंत्ययात्रा चक्क पुराच्या पाण्यातून काढावी लागली आहे. गावकऱ्यांनी पुराच्या पाण्यातून मृतदेह नदीच्या दुसऱ्या बाजुला नेला आहे. या घटनेचा व्हिडीओ समोर आला असून सोशल मीडियात व्हायरल होत आहे. नूरअली साहेब अली भंडारी असं मृत पावलेल्या व्यक्तीचं नाव आहे. ते पितापूर येथील रहिवासी होते. त्यांच्या मृत्यूनंतर गावकऱ्यांनी पुराच्या पाण्यातून त्यांची अंत्ययात्रा काढली आहे.

पितापूर आणि आकांतळा दोन गावांना जोडणाऱ्या पुलाची उंची कमी असल्याने गावकऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. स्मशानभूमीकडे जाण्यासाठी पितापूर येथील ग्रामस्थांना मृतदेह चक्क नदीच्या पाण्यातून नेला आहे. सोलापूर जिल्ह्यातील या विदारक घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. संबंधित दोन गावांना जोडणाऱ्या पुलाची उंची वाढवावी, अशी मागणी गावकरी प्रशासनाकडे केली आहे.

## म्हैसाळ हत्याकांड प्रकरणी महिलेला पोलीसांकडून अटक




साप्ता. अधिकारनामा

**सांगली** : म्हैसाळमध्ये झालेल्या वनमोरे कुटुंबातील ९ जणांच्या हत्याकांड प्रकरणी सोलापुरातील एका महिलेला पोलीसांनी आज मंगळवारी अटक केली. मुख्य संशयित असलेल्या अब्बास बागवान या मांत्रिकाची ही महिला बहिण आहे. म्हैसाळ येथील डॉ. माणिक वनमोरे व त्यांचा भाऊ पोपट वनमोरे या दोन कुटुंबातील ९ जणांचे २० जून रोजी हत्याकांड झाले. गुप्तधन काढून देण्यासाठी मांत्रिक बागवान यांने वनमोरे कुटुंबाकडून लाखो रुपये उकळले होते. यातूनच बागवान यांने कुटुंबातील ९ जणांची विष देऊन हत्या केल्याचे तपासात समोर आले.

या गुन्ह्यात मदत केल्या प्रकरणी आज जैतूनबी उर्फ जैतूबाई महमंद हनिफ बागवान (वय ६० रा. अमन अपार्टमेंट, मुस्लिम बादशा पेठ, सोलापूर) या महिलेला अटक करण्यात आली. न्यायालयासमोर तिला हजर केले असता ११ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश मिळाले. पुढील तपास उप अधिक्षक अशोक विरकर हे करीत आहेत.

संपादकीय

# ‘नीति’ आयोगाचे बौद्धिक!

मिल्टन फ्रीडमन हे विसाव्या शतकातील महत्त्वाचे आर्थिक तत्त्ववेत्ते. नोबेल पारितोषिक विजेत्या फ्रीडमन यांची अनेक वचने अर्थसुभाषिते गणली जातात. “मानवी संस्कृतीतील भव्य प्रगती.. मग ती स्थापत्यकला असो वा चित्रकला, विज्ञान, साहित्य, कृषी किंवा उद्योग.. ही एककल्ली (सेंट्रलाइज्ड) सरकारमुळे कधीच झालेली नाही”, हे त्यातील एक. याचा अर्थ असा की सरकार जितके विकेंद्रित तितकी प्रगतीची संधी अधिक. फ्रीडमन हे अमेरिकी. त्या देशातील संघराज्य व्यवस्थेच्या अनुषंगाने त्यांचे हे भाष्य ‘नीति’ आयोगाची नुकतीच पार पडलेली बैठक, तीबाबतच्या घडामोडी यामुळे आठवते. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत २३ राज्यांचे मुख्यमंत्री, तीन प्रांतांचे नायब राज्यपाल, दोन प्रशासक आणि अर्थ, संरक्षण, परराष्ट्र आदी खात्यांच्या मंत्र्यांचा समावेश होता. गेली दोन वर्षे करोनामुळे नीती आयोगाची बैठक अशी सदेह घेता आली नव्हती. त्यामुळे या बैठकीस महत्त्व होते. पंतप्रधानांनी अपेक्षेप्रमाणे या बैठकीत मार्गदर्शन केले आणि केंद्र-राज्य संबंध किती महत्त्वाचे आहेत इत्यादी विधाने केली. तसेच; ‘करोना हाताळणीत सर्वच राज्यांनी बिनीची कामगिरी बजावली,’ असे पंतप्रधान म्हणाले. जेव्हा सर्वाचे असे सरसकट कौतुक केले जाते तेव्हा कोणाचेच कौतुक न करणे हा त्यामागील उद्देश बऱ्याचदा असतो. हे सत्य लक्षात घेता पंतप्रधानांच्या विधानाचा खरा अर्थ असा की प्राणवायूची कमतरता भासली तरी, सरकारी प्रशासन कोठेच दिसले नाही तरी आणि अनेक मृतदेहांस गंगाप्रवाहातून मोक्षमुक्ती द्यावी लागली तरी उत्तर प्रदेशची कोविड कामगिरीदेखील कौतुकास्पदच होती. त्याचप्रमाणे ‘आपले संघराज्य हे विश्वासाठी एक आदर्श प्रारूप आहे’ हेदेखील पंतप्रधानांचे विधान. ते अत्यंत योग्य आणि स्वागताह.ʼतथापि ते कोणत्या विश्वासाठी आदर्श आहे हेदेखील त्यांनी स्पष्ट केले असते तर भरतवासीयांस निश्चित तुलनेची संधी मिळती. ‘सगळेच चांगले’ या विधानाप्रमाणे ‘पूरे विश्वमे..’ असे म्हणणे हे अनिश्चितता निदर्शक ठरते. या बैठकीतील अन्य बौद्धिकाविषयी. पीकपद्धतीतील बदल, डाळी/तेलबिया यांच्या उत्पादनांत देशास स्वावलंबी बनवणे, राष्ट्रीय शिक्षण धोरण आदी काही महत्त्वाचे मुद्दे या बैठकीच्या कार्यक्रमपत्रिकेवर होते. त्यांचे महत्त्व कोणीच अमान्य करणार नाही. या सर्व मुद्दय़ांबाबत राज्यांनी सकारात्मक धोरण अवलंबावे असा पंतप्रधानांचा सल्ला. तोही रास्तच. पण खुद्द केंद्र सरकारात अशा काही धोरण दिशा बदलाची हिंमत आहे का, हा या संदर्भात खरा प्रश्न. केंद्र सरकारलाही शेतकऱ्यांच्या सुधारणांपेक्षा शेतकरी या घटकाच्या राजकीय महत्त्वास गोंजारण्यातच अधिक रस आहे हे वेळोवेळी दिसून आले आहे. गतसालची- कृषी सुधारणा विधेयकांवर केंद्राने घेतलेली- सपशेल माघार हे याचे बोलके आणि ताजे उदाहरण. बलदंड शेतकऱ्यांच्या दबावगटास बळी पडून किमान आधारभूत किमतीच्या मुद्दय़ावर केंद्राने कशी माघार घेतली आणि याच शेतकरी दबावामुळे ठरावीकांच्याच भल्याचा विचार केंद्र कसे करते हे साऱ्या देशाने पाहिले. जर दबावगटांस भिऊन भात, तांदळाच्या हमखास खरेदीची हमी सरकारकडून दिली जात असेल तर अन्य पिके घेण्यात शेतकऱ्यांना कसे काय स्वारस्य असणार? सरकारकडून हमखास खरेदीची हमी आणि त्यामुळे हमखास उत्पन्न जर मिळणार असेल तर शेतकरी अधिक जोखमीची पिके घेतीलच कशाला? तेव्हा राज्यांस उपदेश करण्यापूर्वी केंद्राने आधी हा सुधारणावादी सल्ला स्वतः अमलात आणणे गरजेचे आहे.

दुसरा आणि पहिल्यापेक्षाही महत्त्वाचा मुद्दा असा की मुळात कृषी हा घटनेनुसार राज्यांच्या अखत्यारीतील विषय. तो राज्यांप्रमाणे केंद्राच्याही यादीत हवा अशी मागणी करणारी याचिका सवीच्च न्यायालयात दाखल असली तरी तीवर अद्याप तरी निणऱ्य झालेला नाही. तो होत नाही तोपर्यंत तरी शेती ही राज्यांचीच जबाबदारी असणार आहे. हे सत्य लक्षात घेतल्यास केंद्रास कृषी कायद्यांची उरस्फोड करण्याचेच मुदलात कारण नव्हते. ती करायची आणि वर राज्ये ऐकत नाहीत म्हणूनही तक्रार करायची यात काही अर्थ नाही. केरळचे मुख्यमंत्री पिनरयी विजयन यांनीही हाच मुद्दा उपस्थित केला. जे मुद्दे केंद्र आणि राज्य असे उभयतांच्या जबाबदारीचे असतील त्यांबाबत निणऱ्य घेताना केंद्राने आधी राज्यांशी सल्लामसलत करावी ही त्यांची मागणी कोणीही अमान्य करणार नाही. केंद्राने २०१२ साली साधी दहशतवाद प्रतिबंधक व्यवस्थेविषयी अधिसूचना काढली म्हणून गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी असताना नरेंद्र मोदी यांनी आकाश-पाताळ एक केले होते. मनमोहन सिंग सरकार हे राज्यांचे अधिकार कसे पायदळी तुडवत आहेत असे मोदी त्या वेळी वारंवार सांगत. त्यांची त्या वेळची वक्तव्ये लक्षात घेता विजयन यांची मागणी अगदीच मवाळ म्हणायला हवी. तिचे महत्त्व केंद्र-राज्य संबंधांचे जाज्वल्य रक्षणकर्ते मोदी निश्चितच अमान्य करणार नाहीत. वस्तू/सेवा करासंदर्भात राज्यांचा वाटा हा मुद्दाही या बैठकीत चर्चिला गेला. राज्यांचे म्हणणे असे की केंद्राकडून या करापोटी दिली जाणारी नुकसानभरपाई अधिक कालावधीसाठी मिळायला हवी. राज्यांच्याच दृष्टिकोनातून पाहू गेल्यास ही मागणी अत्यंत महत्त्वाचीच ठरते. आर्थिक मुद्दय़ांचे विश्लेषण राजकीय अंगाने करण्याचा पायंडा तात्पुरता दूर केला आणि केंद्रात बिगरभाजप सरकार आहे हे फक्त चर्चेसाठी गृहीत धरले तर या मुद्दय़ावर भाजपशासित राज्यांची भूमिका काय असेल याचा विचार संबंधितांनी करावा. केंद्रातील काँग्रेस सरकारच्या काळात भाजपशासित राज्यांचा महसूल कमी झाला असता तर ते जितके अयोग्य ठरले असते तितकेच केंद्रातील भाजप सरकारच्या काळात राज्यांच्या महसुलास कात्री लागणे गैर ठरेल. या मुद्दय़ावर भाजपशासित राज्यांची तोंडातून ब्र काढण्याची हिंमत असणार नाही, हे उघड आहे. तेव्हा बिगरभाजपशासित राज्यांची वस्तू/सेवा कर नुकसानभरपाई मुदतवाढीची मागणी निश्चितच समर्थनीय. या पार्श्वभूमीवर या बैठकीतील बिगरभाजप राज्यांच्या अन्य मुख्यमंत्र्यांची अनुपस्थिती लक्षणीय ठरते. याचे कारण असे की गुजरातच्या मुख्यमंत्रीपदावरून मोदी जी भाषा करीत त्याचाच विविधभाषी आविष्कार बिगरभाजप राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या भाषेतून दिसला. त्या वेळी जर मोदी यांची भाषा आणि त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे योग्य होते असे(च) जर मानायचे असेल तर या वेळी हे बिगरभाजप मुख्यमंत्री उपस्थित करीत असलेले मुद्दे(ही) योग्यच मानले जायला हवेत. केंद्राने राज्यांवर आपल्या योजना, कल्पना लादू नयेत ही या बैठकीसंदर्भात बिगरभाजप राज्यांनी प्राधान्याने केलेली तक्रार. केंद्र जी ‘सहकारी संघराज्य’ (कोऑपरेटिव्ह फेडरलिझम) या संकल्पनेची सतत भलामण करते ती पाहता केंद्राने राज्यांवर आपल्या योजना लादू नयेत ही बिगरभाजप राज्यांनी केलेली मागणी अजिबात अवास्तव नाही. राहता राहिली एक बाब. आपण म्हणजे कोणी शिक्षक आहोत आणि राज्ये जणू विद्यार्थी हा अलीकडच्या काळात प्रकर्षाने दिसणारा केंद्राचा दृष्टिकोन! तो एकाच वेळी हास्यास्पद आणि केविलवाणा दोन्ही ठरतो. हास्यास्पद कारण काही राज्यांप्रमाणे केंद्राची काही नीतीधोरणेही शहाणपणाच्या निकषावर उतरणारी नव्हती/नाहीत आणि केविलवाणा कारण त्यातून समोर येणारी ओढूनताणून थोरलेपण मिरवण्याची हौस. त्याची गरज नाही. सहकारी संघराज्य हे तत्त्व आचरणातही आणायचे असेल तर राज्यांस बरोबरीचे मानायला हवे. कारण राज्यांना समवेत घेतल्याखेरीज; फ्रीडमन म्हणतात त्याप्रमाणे; एकटय़ा केंद्राकडून काही भव्य होणार नाही. नपेक्षा ‘नीति’ आयोगाच्या बैठका म्हणजे सत्ताधारी भाजपचे बौद्धिक ठरतील.

# सक्षम, समृद्ध नवभारताकडे वाटचाल



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना पुढील २५ वर्षांत म्हणजे स्वातंत्र्याची शताब्दी साजरी करतेवेळी बलशाली, समृद्ध, आत्मनिर्भर राष्ट्र आकाराला यावे असा संकल्प करा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. गेल्या आठ वर्षांत मोदी सरकारने असा भारत घडविण्यासाठी निर्धारपूर्वक केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नांना यश मिळत आहे. गोरगरीब, वंचित वर्गाला शासकीय योजनांचे फायदे देऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यापासून भारताची कुरापत काढणाऱ्या शक्तींना धडा शिकविण्यासाठी हवाई हल्ले करण्यापर्यंतचा भारताचा गेल्या आठ वर्षांतील प्रवास विस्मयकारक आहे. या पायाभरणीमुळे स्वातंत्र्याचा शताब्दी महोत्सव साजरा करतेवेळी भारत हा संपन्न, समृद्ध आणि सामर्थ्यशाली देश म्हणून आकाराला येईल असा विश्वास वाटू लागला आहे. गेल्या आठ वर्षांत मोदी सरकारने नेमके काय केले, याचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न.. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेवर येण्यापूर्वीचे देशाचे चित्र आठवून पाहा. पाकिस्तानच्या पाठबळाने दहशतवाद्यांनी २००४ ते २०१४ या १० वर्षांत उच्छाद मांडला होता. अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट होत होते, त्यात निरपराधांचे बळी जात होते, २६ नोव्हेंबर २००८ रोजी मूठभर पाकिस्तानी अतिरेक्यांनी देशाच्या आर्थिक राजधानीवर-मुंबईवर हल्ला करून दहशतवाद किती प्रबळ झाला आहे, हे दाखवून दिले. सरकार नामक यंत्रणा अस्तित्वात आहे की नाही, अशी शंका यावी इतपत गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. सीमेवर पाकिस्तानी सैन्याकडून आंतरराष्ट्रीय नियंत्रण रेषा ओलांडून भारतीय सैनिकांच्या हत्या, शिरच्छेद करण्याचे प्रकार वाढले होते. त्या वेळच्या पाकिस्तानी पंतप्रधानांकडून तत्कालीन भारतीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचा जाहीर उपमर्द करण्याची मुजोरी दाखवली गेली. चीननेही घुसखोरी करून भारताची कुरापत काढण्याची संधी सोडली नव्हती. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार सत्तेत असताना चीनने भारताचा थोडाथोडका नव्हे तर ३८ हजार चौरस मीटर एवढा भूभाग बळकावला होता, असे संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारनेच राज्यसभेत दिलेल्या उत्तरात कबूल केले होते. भाजपचे खासदार वाय. एस.चौधरी यांनी विचारलेल्या प्रश्नावर त्या वेळचे परराष्ट्र राज्यमंत्री इ. अहमद यांनीच ही कबुली दिली होती. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर चीनच्या घुसखोरीला जशास तसे उत्तर दिले गेले. जून २०२० मध्ये चीनच्या सैनिकांनी भारतीय सैनिकांवर हल्ला चढविल्यानंतर चीनच्या सैन्याला त्याच भाषेत प्रत्युत्तर दिले गेले. चीनला भारतीय सैन्याकडून कडवा प्रतिकार अपेक्षितच नव्हता. खरे तर चीनला मोदी सरकार सत्तेत आल्यानंतरच्या बदललेल्या भारताची चुणूक भूतानच्या डोकलाम भागात २०१७ मध्येच आली होती. या भागात बांधकाम करणाऱ्या चीनच्या लाल सैन्याला भारतीय सैन्याने रोखले होते. २०१६ चा सर्जिकल स्ट्राइक आणि २०१९ मध्ये बालाकोटचा हवाई हल्ला यातून दहशतवाद्यांना पाठीशी घालणाऱ्या पाकिस्तानच्या लष्कराला आणि सत्ताधाऱ्यांना चांगला धडा मिळाला.

संपूर्ण विश्व बदललेल्या भारताकडे आश्चर्यकारक नजरेने पाहत होते. भारताने आंतरराष्ट्रीय राजनीतीत कधीच आक्रमणाचा पुरस्कार केलेला नाही. शेजारी राष्ट्रांच्या आक्रमकतेला, कुरापतींना अनेक वर्षे सहनशील प्रवृत्तीने उत्तर दिले जात होते, मोदी सरकारने शेजारी राष्ट्रांना समजेल अशाच भाषेत उत्तर देऊन राष्ट्राच्या सामर्थ्यांचा परिचय करून दिला. आता भारताच्या वाटेला जाण्यापूर्वी आपले शेजारी १०० वेळा विचार करतील. देशाला संरक्षणसिद्ध करत असतानाच मोदी सरकारने गुप्तचर यंत्रणेला सशक्त, कार्यक्षम करून देशांतर्गत दहशतवादी कारवायांना आळा घातला. २०१४ ते २०२२ या काळात २ जानेवारी २०१६ रोजी पठाणकोट, सप्टेंबर २०१६ मध्ये उरी (काश्मीर) आणि २०१९ मध्ये पुलवामा अशा दहशतवादी हल्ल्यांच्या तीन घटना वगळता पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांच्या कारवाया रोखण्यात आपल्या सुरक्षा यंत्रणांना यश आले. कणखर आणि सतर्क राष्ट्र अशी प्रतिमा तयार करण्यात मोदी सरकारला यश आले. एकीकडे अंतर्गत आणि बाह्य धोक्यांपासून देशाचे रक्षण करत असताना मोदी सरकारने भारताला संपन्न, समृद्ध राष्ट्र करण्यासाठीही गेल्या आठ वर्षांत निर्धारपूर्वक पावले टाकली आहेत. या प्रयत्नांना हळूहळू यश मिळत आहे. याचे प्रत्यंतर देशाच्या निर्यातीत झालेल्या विक्रमी वाढीतून येते. जून २०२२ मध्ये भारताची निर्यात ६४ अब्ज ९१ कोटी डॉलर्स एवढी झाली. २०२१ च्या तुलनेत भारताची निर्यात २३ टक्क्यांनी वाढली. ‘स्टार्ट अप इंडिया’, ‘मेक इन इंडिया’, ‘आत्मनिर्भर भारत’ अशा विविध योजनांच्या माध्यमांतून युवक व अन्य वर्गाच्या उद्यमशीलतेला, संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देत आंतरराष्ट्रीय निकषांवर उतरणारी वेगवेगळया क्षेत्रांतील उत्पादने देशात तयार होत आहेत. खेळण्यांची उत्पादने भारताला दोन-तीन वर्षांपूर्वीपर्यंत आयात करावी लागत होती. खेळण्यांच्या आयातीत चीनचा मोठा (८० टक्के) वाटा होता. मोदी सरकारच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे खेळण्यांची आयात थोडीथोडकी नव्हे तर ७० टक्क्यांनी घटली. तर भारतात तयार करण्यात आलेल्या खेळण्यांच्या निर्यातीत ६१ टक्क्यांनी वाढ झाली. भारतीय खेळणी बाजारपेठेवर स्वस्त चिनी खेळण्यांचे वर्चस्व निर्माण झाले होते. हे वर्चस्व ‘मेक इन इंडिया’च्या परिणामकारक अंमलबजावणीमुळे मोडून काढले गेले. २०२१-२२ मध्ये भारतीय खेळण्यांची निर्यात ३२६ अब्ज डॉलरवर पोहोचली.

# ..तरीही लस घ्यावी; ती का?

स्वातंत्र्यदिनाच्या अमृत महोत्सवाची जनतेला एक भेट म्हणून १५ जुलै ते ३१ ऑगस्ट १८ ते ६० वयोगटातीलही लोकांना कोविड-१९-लस मोफत मिळेल, असे सरकारने जाहीर केले. त्यामागची पार्श्वभूमी व कोविड-१९च्या नव्या लाटेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी तिसरा डोस घ्यावा का याची थोडक्यात चर्चा करू. हा बूस्टर डोस सुमारे सहा महिने सर्वासाठी मोफत नव्हता. पंतप्रधानांनी २५ डिसेंबर २०२१ रोजी जाहीर केले होते की कोविड-१९-लशीचे दोन डोस मिळालेल्या ज्येष्ठ नागरिकांना तिसरा डोस १० जानेवारी २२ पासून घेता येईल. ‘द वायर’च्या बनज्योत कौर यांनी माहिती अधिकाराच्या वापरातून नेटाने काही महिने प्रयत्न करून पुढे आणले की लशीच्या वापराला परवानगी देण्यासाठी भारतात असलेल्या पाच-सहा राष्ट्रीय समित्यांपैकी कोणाचीच हा बूस्टर डोस देण्याची शिफारस नव्हती! सिरम इन्स्टिटय़ूटने बूस्टर डोससाठी केलेला अर्ज फेटाळताना २१ डिसेंबरला संबंधित तज्ज्ञ समितीने म्हटले की इंग्लंडमधील ७५ लोकांवर केलेल्या संशोधनाचा सिरमने आधार घेतला आहे. भारतीय लोकांवर अभ्यास करून त्यांनी अर्ज करावा. असे असूनही १० जानेवारीपासून सरकारने सर्वाना तिसरा डोस देण्याचे का ठरवले? २२ एप्रिल २०२२ला सिरम इन्स्टिटय़ूटच्या पूनावालांनी जाहीर केले की त्यांनी ३१ डिसेंबरपासून ‘कोव्हिशिल्ड’चे उत्पादन मागणी नसल्याने बंद केले. बूस्टर डोस व मुलांना लस देण्याबाबत निणऱ्य मंद गतीने होत असल्याची त्यांनी तक्रार केली. पण बनज्योत कौर यांना ३० जून २२ ला ‘ड्रग्स कंट्रोलर’ने कळवले की मुळात असे डोस देण्यासाठी त्यांच्याकडे कोणीही परवानगी मागितलेली नाही! दोन्ही डोस घेतलेल्यांचे प्रमाण एप्रिल ते जून या काळात ६० टक्क्यांहून फक्त ६५ टक्क्यांपर्यंत वाढले कारण लोकांचा लस घेण्याचा कल कमी झाला आहे. ज्येष्ठ नागरिकांना तिसरा डोस मोफत मिळत असूनही फक्त पाच कोटी लोकांनी तिसरा डोस घेतला. पूनावालांनी सांगितले की सप्टेंबरनंतर त्यांचे २० कोटी डोस निकामी झाल्याने फेकून द्यावे लागतील. २२ जूनला आरोग्य मंत्रालयाने जाहीर केले की राज्य व केंद्र सरकारांकडे कोविड-लशीचे सुमारे १२ कोटी डोस पडून आहेत. बूस्टर डोस देण्याबाबत भारतात पुरेसे संशोधनच झाले नसताना लशीचे डोस वाया जाऊ नये म्हणून सरकारने सरसकट सर्व प्रौढांना ३१ ऑगस्टपर्यंत मोफत कोविड-१९ लस देण्याचा निणऱ्य घेतला असा संशय येतो.

कोविड-१९ विषाणूचे उपप्रकार आल्याने नवे आव्हान उभे राहिले. डिसेंबर-२०२१ पासून ‘ओमायक्रॉन’ उपजातीच्या विषाणूमुळे नवी लाट आली. त्यात सहा महिन्यांपूर्वी लस घेतलेल्यांना किंवा कोविड-१९ झालेल्यांनाही ‘ओमायक्रॉन’ची बाधा झाली. पण ‘ओमायक्रॉन’च्या रुग्णांमध्ये हॉस्पिटलमध्ये दाखल होण्याचे व मृत्यूचे प्रमाण खूपच कमी राहिले असे सरासरी काढल्यावर अगदी ढोबळपणे दिसते. हमी कशाचीच नाही. ‘ओमायक्रॉन’ची साथ ओसरू लागल्यावर वाटले होते की आता आणखी लाट कदाचित येणार नाही. पण ‘बीए-५’ या नव्या उप-प्रजातीची लाट येऊन कोविड-१९ आजार युरोप- अमेरिकेमध्ये खूप वेगाने पसरतो आहे. भारतातही हे होऊ घातले आहे. अमेरिकेमध्ये रोज ३०० पेक्षा जास्त जण या लाटेमध्ये दगावत असून रोज सुमारे सव्वा लाख लोकांना नवीन लागण होते! त्यापासून संरक्षण मिळवण्याचा एक मार्ग म्हणजे बूस्टर डोस घेणे. पण दुसऱ्या बाजूला नवे संशोधन सांगते की सध्याच्या लशींमुळे मिळणारे संरक्षण डेल्टा, ‘ओमायक्रॉन’, ‘बीए-५’ या नव्या उप-प्रजातींच्या विरोधात कमी झाले आहे. दोन लशी घेतल्यावरही, बूस्टर घेतल्यावरही कोविड-१९ झाल्याचे अनेक नागरिकांनी ऐकले, पाहिले, अनुभवले आहे. मात्र कोविड-१९ झाल्यावर हॉस्पिटलमध्ये दाखल होण्याचे प्रमाण कमी असल्याने बूस्टर डोस कशाला घ्यायचा असा अनेकांना प्रश्न आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने पद्धतशीर लोकशिक्षणाची मोहीम आखून याचे शास्त्रीय उत्तर सोप्या भाषेत द्यायला हवे. तसे न करता ३१ ऑगस्टपर्यंत सर्व प्रौढांना मोफत लस देण्याचा नुसता निणऱ्य जाहीर केला. त्यामुळे लोकांचा प्रतिसाद थंड राहणे साहजिक आहे.

# आधी घरातील भेदभाव दूर करा

‘अमृतकालीन विष’ हे संपादकीय (८ ऑगस्ट) वाचले. भारतीय दंड संहितेच्या कलम ३७५ मध्ये बलात्काराची व्याख्या केली आहे. भारतात दर १७ मिनिटांत एक महिला, बालिका, वृद्धा, तरुणी यांपैकी कोणा ना कोणाला अशा भयानक वेदनांना सामोरे जावे लागते. ही केवळ नोंदणीकृत माहितीनुसार मांडलेली आकडेवारी आहे. यात उत्तर प्रदेश वरच्या स्थानी तर आंध्र प्रदेश व केरळ तळाशी आहेत. यातून केवळ एकच सत्य समोर येते ते म्हणजे पुरुषी विकृती. ही आकडेवारी समाजाची नैतिक अधोगती दर्शवते. सशक्ताने अशक्तास चिरडणे, सबलाने अबलास कस्पटासमान लेखणे, बहुमताने अल्पमताकडे दुर्लक्ष करणे ही वृत्ती यातून अधोरेखित होते. बलात्काराचे गुन्हे केवळ कडक शिक्षेने कमी होतील असे मानण्यात अर्थ नाही. त्यासाठी त्वरित न्यायनिवाडा होणे आणि मानवी मूल्यवर्धनासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. पहिला मार्ग तात्पुरता तर दुसरा दीर्घकालीन परिणाम साधणारा आहे. या प्रयत्नांची सुरुवात कौटुंबिक स्तरावर मुलगा आणि मुलीमधील भेदभाव दूर करण्यापासून व्हायला हवी. घरात लोकशाही नसेल तर ती देशात नांदू शकत नाही. ‘अमृतकालीन विष’ हा अग्रलेख (८ ऑगस्ट) वाचला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना ग्रामीण पातळीवर होणाऱ्या बलात्कारांचे भयानक वास्तव सर्वासमोर येत आहे. बलात्काराच्या किंवा कोणत्याही लैंगिक, शारीरिक हिंसेच्या घटनेचा अर्थ सत्तासंबंध लक्षात घेऊन लावणे महत्त्वाचे असते. धर्म, जात- जमात, लिंग, वय इत्यादी. सत्तेची उतरंड पाहता, ज्यांच्या हाती सत्ता नाही, ते हिंसेला बळी पडण्याचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे तो एक राजकीय-सामाजिक मुद्दा आहे. त्याचे राजकारण करू नका, असे म्हणणे हेही राजकारणच असते.

हे थांबविण्यासाठी गरज आहे, राजकीय इच्छाशक्तीचीच! स्त्रियांना- मुलींना सर्व दृष्टीने सक्षम करण्यासाठी, निर्भयपणे वावरता यावे, यासाठी स्वच्छंदी वातावरण तयार करणे, महत्त्वाचे आहे. बलात्कार ही गंभीर, निंदनीय आणि स्त्रीच्या सन्मानावर आघात करणारी कृती आहे, हे निःसंशय. त्यामुळे बलात्कार करणाऱ्या व्यक्तींना न्यायविषयक तत्त्वांचे पालन करून कठोर आणि जलद शिक्षा द्यावी, अशी भूमिका असली पाहिजे. दिल्लीतील बलात्काराच्या प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटल्यानंतर तरी अशा गुन्ह्यांचे प्रमाण कमी होईल, अशी आशा जनतेला विषेशतः स्त्रियांना वाटू लागली होती. परंतु भंडारा सामूहिक बलात्काराच्या घटनेने पुन्हा एकदा समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. शिंदे- फडणवीस सरकारने अल्पावधीत अनेक महत्त्वाचे निणऱ्य घेतले आणि आधीच्या सरकारने घेतलेले निणऱ्य बदलले. एवढय़ाच तत्परतेने सरकारने स्त्री-संरक्षणासाठी एखादा महत्त्वाचा निणऱ्य घेतला असता, तर स्त्रियांच्या हिताचे ठरले असते. असेच सुरू राहिले तर, आजच्या काळातील द्रौपदीची प्रतिष्ठा शाबूत राहावी, म्हणून प्रयत्न करणारा श्रीकृष्ण कोण, हा प्रश्न समस्त स्त्रीवर्गाला कायम सतावत राहील. आपण या वर्षी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहोत, मान्य! पण इंग्रजांच्या राजवटीतून मुक्त होऊन एवढा प्रचंड काळ लोटल्यानंतरही देशातील स्त्रिया नराधमांपासून सुरक्षित नाहीत. माध्यमांनी अशा गंभीर घटनांविरोधात आवाज उठवणे महत्त्वाचे आहे, पण त्यांना राजकारणाशिवाय इतर विषयच दिसेनासे झाले आहेत. स्त्रियांवरील अत्याचारांविरोधात अनेक कायदे झाले, मात्र ते कागदावरच राहिले. आज ‘हर घर तिरंगा’सारख्या मोहिमा राबविण्याऐवजी ‘हर घर स्त्री सुरक्षा’ अशी मोहीम राबविण्याची गरज आहे. ‘भाजपला नाही घराणेशाहीचे वावडे’ हा लेख (७ ऑगस्ट) वाचला. राजकारणात घराणेशाहीचे कोणालाच वावडे नसते आणि तरीही सर्वच पक्षांचे नेते एकमेकांवर घराणेशाहीचे आरोप करतात. भारतीय संविधानाप्रमाणे काही अटी पूर्ण करणा‌ऱ्या प्रत्येक नागरिकाला निवडणूक लढविण्याचा हक्क आहे. डॉक्टर, वकील, सीए इत्यादींची मुले जशी वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांचाच व्यवसाय निवडतात, त्याचप्रमाणे राजकारण्यांची मुले राजकारणात येतात. राजकारणात कोणीही आले, तरीही भारतासारख्या लोकशाहीत टिकून राहण्यासाठी लोकांतून निवडून येणे महत्त्वाचे असते. तरच एखादी व्यक्ती लोकप्रतिनिधी होऊ शकते. लोकच नेत्यांच्या मुलांना निवडून देत असतील, तर त्यात आक्षेपार्ह काय आहे? काही वेळा असे नेत्यांचे नातेवाईक निवडणुकीत हरतातदेखील. केवळ नेत्याचा मुलगा म्हणून मतदार निवडून देतीलच असे नाही. त्यामुळे घराणेशाहीवरील टीका हा केवळ प्रचाराचा एक भाग आहे. व्यवहारात कोणत्याही पक्षाचा किंवा पक्षाच्या नेत्याचा त्याला विरोध नसतो. वेळ आली की प्रत्येक जण आपापल्या वारसांचे भविष्य सुरक्षित करण्याचा प्रयत्न करतातच. ‘ध्वजसंहितेचे बंधन कसे पाळणार?’ हा ‘लोकमानस’मध्ये (८ ऑगस्ट) मांडलेला मुद्दा पटला. जे गरीब आहेत, ज्यांना राहायला घर नाही, ते घरावर झेंडा कसा फडकवणार? ‘हर घर तिरंगा’ मोहीम सरकारने हाती घेतली खरी, मात्र गरिबीचे प्रमाण २७.७ टक्के एवढे प्रचंड असल्याचे निती आयोगानेच म्हटले आहे. साहजिकच यापैकी अनेकांकडे घर नाही. घरांची समस्या समजून घेण्यासाठी या आकडेवारीचीही गरज नाही, रेल्वे स्थानके, पदपथ, बसथांबे अशा सार्वजनिक ठिकाणी डोळे उघडे ठेवून फिरणाऱ्या कोणालाही हे विदारक वास्तव दिसतेच. या बेघरांना घर मिळवून देण्यासाठी किंवा घर खरेदी करण्यास सक्षम करण्यासाठी पावले उचलली जाणे गरजेचे आहे. त्यांना घर मिळाले, तर तेही झेंडा नक्कीच फडकवतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या आठ वर्षांत एकदाही पत्रकार परिषदेला सामोरे गेले नाहीत. या काळात बेरोजगारी, नोटाबंदी, जीएसटी, नमामी गंगा, काश्मीरमध्ये ४४ जवान शहीद, शेतकरी आंदोलनात ७००हून अधिक शेतकऱ्यांचे बळी अशा अनेक घटना घडल्या. २२ सरकारी कंपन्यांचे खासगीकरण झाले, या कंपन्यांतील कामगार देशोधडीला लागले. ‘करूया अर्थनिग्रह’ या सदरातील ‘योग्य विमा विक्रेता निवडणेही महत्त्वाचेच!’ हा लेख (८ ऑगस्ट) वाचला. ही काळाची गरज आहे. अलीकडे विमा क्षेत्रात ग्राहकांच्या फसवणुकीचे प्रमाण वाढले आहे. विमा विक्रेत्याची अचूक माहिती काढणे ग्राहकाला शक्य नसते. कोणतीही विमा कंपनी आपल्या संकेतस्थळावर विमा विक्रेत्याचा तपशील (त्याची शैक्षणिक पात्रता, त्याचा विमाक्षेत्रातील अनुभव, त्यांनी विमासंबंधी पूर्ण केलेले प्रशिक्षण इत्यादी) जाहीर करत नाही. ज्या विमा कंपन्या सरकारी आहेत उदा. एलआयसी, जीआयसी इत्यादी त्यांनी तरी किमानपक्षी त्यांच्या संकेतस्थळावर विमा विक्रेत्याचे नावे व इतर तपशील जाहीर करायला हवा. माहिती अधिकार कायद्याच्या कलम ४ (ब) अन्वये तसे करणे या कंपन्यांना बंधनकारक आहे. परंतु याकडे सोयीस्करपणे डोळेझाक केली जाते. ज्या विमा कंपन्या माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत येत नाहीत त्यांच्यावर विमा नियामक प्राधिकरण बंधन घालू शकते. परंतु याकडे लक्ष द्यायला कोणाला वेळ नाही. इतकेच काय तर विमा काढताना नेमकी कोणती कागदपत्रे सादर करायला हवीत, याचासुद्धा तपशील एलआयसीच्या संकेतस्थळावर स्पष्टपणे दिलेला आढळत नाही.

# विज्ञानाला नव्हे, भावनांना धक्का..

वडिलांनी शेतीचा तुकडा विकून परदेशात पाठवलेल्या पुढल्या पिढीने देशातील कुटुंबीयांशी संबंधच ठेवले नाहीत, इतके की या दुरावलेल्या पिढीचा ठावठिकाणाही इथल्यांना माहीत नसावा, असे प्रकार चार-पाच दशकांपूर्वी कानी पडत. ज्यांच्याकडून अपेक्षा ठेवाव्यात अशांनी संपर्कातही न राहणे हे नेहमीच दुःखद असते. तशीच गत, भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात ‘इस्रो’च्या ‘एसएसएलव्ही’ या नव्या लघुउपग्रह प्रक्षेपक यानासह अंतराळात झेपावलेल्या दोन लघुउपग्रहांबाबत झालेली आहे. या दोन्ही उपग्रहांना घेऊन जाणाऱ्या ‘एसएसएलव्ही’ अर्थात ‘स्मॉल सॅटेलाइट लॉंच व्हेइकल’ या प्रक्षेपण यानाने ७ ऑगस्टच्या रविवारी, पृथ्वीची कक्षा ओलांडेपर्यंतचे आपले काम अगदी चोख केले. हे दोन उपग्रह यानापासून विलगही यशस्वीरीत्याच झाले, परंतु पुढले महत्त्वाचे काम उपग्रहांना त्यांच्या कक्षेत सोडून स्थिर करण्याचे. ते होण्याआधी या दोन्ही उपग्रहांचा संपर्कच तुटला, त्यामुळे वृत्तीय (सर्क्युलर) कक्षेऐवजी ते विवृत्तीय (एलिप्टिकल) कक्षेपर्यंत गेले आणि पुढे काय करायचे याच्या ‘इस्रो’च्या वैज्ञानिकांनी दिलेल्या आज्ञा ‘ऐकेनासे’ झाले. अखेर, ‘विदा-संपर्क तुटलेला असल्याने या उपग्रहांना कक्षेत सोडता आलेले नाही. आता ते अंतराळात असले, तरी निरुपयोगी आहेत’ असा त्रोटक का होईना, पण तातडीचा खुलासा इस्रोला करावा लागला. नेमका काय तांत्रिक बिघाड झाल्यामुळे हा संपर्क तुटला, हे समजण्यास वेळ लागेल- कारण सर्वच संभाव्य कारणांची छाननी करून, ‘हेही नीट आहे/ तेहीे ठीकच होते/ पण बिघाड इथे असू शकेल’ असा उणे पद्धतीचा तर्क वापरून हा निष्कर्ष काढावा लागतो. हे निष्कर्ष काढणे फार महत्त्वाचे, कारण नेमका दोष काय होता ते कळले तर तो दूर करून पुढे जाता येते. हाच विज्ञानाचा माग.ʼचुका आर्थिकदृष्टय़ा महागात पडणार असतात म्हणून त्या मुळापासूनच टाळायच्या, ही ‘इस्रो’ची जुनी शिस्त. त्यामुळेच तर, १० ऑगस्ट १९७९ रोजी ‘रोहिणी’ उपग्रहाचे उड्डाण ज्या भारतीय ‘एसएलव्ही’ उपग्रह प्रक्षेपक यानामधून झाले तेव्हापासून या संस्थेने आवर्धित (ऑग्मेंटेड), ध्रुवीय (पोलर), भूसंकालिक (जिओसिंक्रॉनस) ही उपग्रह प्रक्षेपक याने तयार करण्याचे टप्पे यशस्वी केले. आजवर आपण ११५ प्रकारचे उपग्रह याच चार प्रक्षेपकांतून सोडले, त्यांत केवळ ११ वेळा यानाकडून आणि अवघ्या तीनदाच कक्षेआधी उपग्रहाचा संपर्क तुटून अपयश आले. त्या सर्वापेक्षा २०१८ पासून ज्यासाठी प्रयत्न सुरू आहेत ते लघु (स्मॉल) उपग्रह प्रक्षेपक यान निराळे. ते यशस्वी झाल्यावर कदाचित, संरक्षणाप्रमाणे अंतराळ क्षेत्रातही खासगीकरणाला प्रोत्साहन देण्याच्या नव्या धोरणांनुसार, इस्रो ही संशोधन संस्थादेखील ‘अँट्रिक्स’ या आपल्या व्यावसायिक कंपनीमार्फत उद्योगांच्या गरजांनुसार ३०० किलोपर्यंतचे उपग्रह सोडण्याचा व्यवसाय वाढवू शकली असती. हे सारे पुढल्या काळात शक्य होईलच. कारण एक ‘चांद्रयान’ संपर्काबाहेर जाऊन चंद्रावर दिमाखात उतरण्याऐवजी कुठेतरी भरकटले, म्हणून दुसरे उतरणारच नसते असे नाही, ते यशस्वीही होऊ शकते. तसेच ‘एसएसएलव्ही’चेही होईल. विज्ञान दोषांकडे मागे वळून पाहाते, ते पुढे जाण्यासाठीच! पण ‘एसएसएलव्ही’वर ‘ईओएस-२’ या १४५ किलो वजनाच्या उपग्रहाखेरीज, ‘आझादीसॅट’ हा- देशभरच्या सरकारी शाळांतल्या ७५० विद्यार्थिनींच्या सूचनांनुसार बनलेला अतिलघु (८ किलो) उपग्रह होता, त्यावर पंतप्रधान नरेंद मोदी यांचे चित्र होते, त्यामध्ये ‘देश की मिट्टी’सुद्धा होती.. या साऱ्या प्रतीकात्मकतेमागील भावनांना बसलेला धक्का मात्र सांत्वनापलीकडचा असणार, हेही समजून घ्यायला हवे.

थोडक्यात

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



**सोनेराव गायकवाड**

**लातूर :** मराठी साहित्यात उपेक्षितांच्या अंतरंगाचा वेध घेणारे,..तसेच अवघ्या दीड दिवसाचे शिक्षण घेऊन साहित्याचा मान मिळविणारे थोर समाजसुधारक लेखक, कवी, साहित्यरत्न, लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांची १०२ वी जयंती. लातुर तालुक्यातील गंगापूर गावामध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते असलेले महादेव गायकवाड व जेष्ट नागरिक,महिला यांच्या शुभ हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे,व क्रांतिवीर वस्ताद लहुजी साळवे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामाजिक कार्यकर्ते महादेव गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आहे. या वेळी सामाजिक कार्यकर्ते तथा पोलीस हेडकोन्स्टेबल बलभीम गायकवाड, लातूर ग्रामीणचे हेडकोन्स्टेबल बाबू येणकुरे, अभंग गायकवाड, प्रदीप गायकवाड, सतीश गायकवाड, प्रशांत शिंदे, संदीप रणदिवे, विकास गायकवाड, लालासाहेब गायकवाड, बालाजी गायकवाड, तुकाराम गायकवाड, संजय शेलार, भाऊसाहेब शेलार, नागनाथ गायकवाड, वसंत गायकवाड, सदाशिव गायकवाड ईत्यादी ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## एफ.डी.सी.एम. वसाहतीत डुकरांचा हैदोस

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** चंद्रपुर जिल्ह्यातील बल्लारपूर येथील एफ.डी.सी.एम. वसाहतीत डुकरांचा हैदोस सुरू असून या समस्येकडे अधिकारी वर्ग लक्ष देईल काय ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. बल्लारपूर येथील वनविभाचे कार्यालय जिल्ह्यातील एक महत्त्वपूर्ण कार्यालय समजले जाते. या शहरात एफ.डी.सी.एम.चे आगार आहे. येथील अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकरिता उत्तम वसाहत तयार करण्यात आली आहे. फार जुनी वसाहत आहे. परंतु इतक्या चांगल्या वसाहतीला कोणाची दृष्ट लागली कोणास ठाऊक, ही वसाहत आता अनेक समस्यांचे माहेरघर बनली आहे. या वसाहतीतील जुनी निवासस्थाने दुरुस्त करण्यात आले आहे. निवासस्थानातील व्यवस्था चांगली आहे. परंतु संपूर्ण वसाहतीत निवासस्थानांच्या आजुबाजुला डुकरांचा हैदोस सुरू आहे. त्यामुळे वसाहतीत राहणा-या नागरिकांना दुर्गंधी आणि घाणीचा सामना करावा लागतो. या ठिकाणी अनेक अपघातसुद्धा झाले आहेत. वसाहतीला लागुनच मुख्य रस्ता आहे. या रस्त्याने वाहने भरधाव वेगाने जातात. येथील कर्मचाऱ्यांची मुले येथे खेळत असतात. तसेच येथे लाकडांचा लिलाव होत असतो. त्यामुळे मोठी गर्दी असते. परंतु हंगामी कामगार (चौकीदार) लक्ष देत नाही. ते फक्त अधिका-यांना सॅल्युट मारण्याचे काम करतात. या वसाहतीत राहणारे वनपाल चौकीदारांनी सॅल्युट का मारले नाही म्हणून त्यांच्यावर चिडतात. रात्रीच्या वेळी वाघ, अस्वल यासारख्या हिंस्र प्राण्यांचे आगमन होत राहते. यांच्यापासून नागरिकांचे संरक्षण करण्याऐवजी हंगामी कामगार मस्त झोपून राहतात. त्यांना काही म्हटल्यास, तुझ्यात दम असेल तर आम्हाला नोकरीतून काढून दाखव असे उत्तर हंगामी कामगाराकडून ऐकायला मिळते. या प्रकाराकडे संबंधित अधिकारी सुद्धा लक्ष देत नाहीत. हिंस्र प्राण्यांचा एखादा हल्ला झाल्यानंतर या बाबींकडे अधिकारी लक्ष देतील काय ? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. तसेच या वसाहतीत प्रेमी युगुल चाळे करताना आढळून आले आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या लहान मुलांवर विपरीत परिणाम होत आहे. या सर्व गोष्टींची दखल घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे.

## नागदेवतांचा पालखी सोहळा उत्साहात साजरा




**अविनाश गायकवाड**

**तरोडा (क) :** शेतकऱ्यांचा मित्र म्हतल्या जाणाऱ्या नांगदेवतांच्या पालखीची मिरवणूक तरोडा (क). या गावात अतिशय आनंदात काढण्यात आली.तसेच गावातील सर्व देवतांच्या मंदिरात जावून त्यांची आरती करण्यात आली त्याचप्रमाणे गावातील भजनी मंडळींनी अतिशय उत्तम असे भजन म्हणून या कार्यक्रमाची शोभा वाढवली. तसेच गावातील स्त्रियांनी नंगदेवतांच्या पालखीचे पूजन केले. पालखी सोहळयात तरुण मंडळी तरुण मंडळी अतिशय जास्त प्रमाणात हजर होती. त्यामुळे कार्यक्रमाला आणखी शोभा आली. दरवर्षी नांगपंचमी निमित्त गावातील महादेव मंदिरात ठाव्याचे आयोजन केले जाते. यावर्षीसुद्धा ५ दिवस ठाव्याचे आयोजन केले आहे.

# शिर्ला ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. अर्चना सुधाकर शिंदे सरपंच पदावर कायम

**अविनाश पोहरे**



**पातूर :** तालुक्यातील शिर्ला ग्रामपंचायतच्या सरपंच अर्चना सुधाकर शिंदे यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याच्या कारणावरून जिल्हाधिकारी यांनी सरपंच अर्चना शिंदे यांना अपात्र घोषित केले होते. यानंतर आयुक्त यांनीसुद्धा जिल्हाधिकारी यांचा निणर्य कायम ठेवत अर्चना शिंदे यांना अपात्र घोषित केले होते . परंतु, या दोन्ही आदेशाच्या विरोधात अर्चना शिंदे यांनी उच्च न्यायालयात दाद मागितल्यानंतर गुरुवारी उच्च न्यायालयाने एकाच दिवसात या प्रकरणावर सुनावणी करत गैरअर्जदार याचा अपात्रतेचा अर्ज खारीज करत अर्चना शिंदे यांना सरपंचपदावर कायम ठेवले आहे. पातूर येथील अनंत बगाडे यांनी शिर्ला ग्रामपंचायतच्या सरपंच अर्चना सुधाकर शिंदे या राहत असलेल्या मालमत्ता ३०५३/१३० शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचे प्रकरण अकोला जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल केले होते. यावरून जिल्हाधिकारी यांनी शिर्ला ग्रामपंचायत ग्राम विकास अधिकारी यांना शिर्ला ग्रामपंचायतीच्या सरपंच अर्चना सुधाकर शिंदे या मालमत्ता क्रमांक ३०५३/१३० मध्ये राहतात किंवा मालमत्ता क्रमांक १४ २१ मध्ये राहतात , याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यावरून ग्रामविकास अधिकारी यांनी स्वयंस्पष्ट अहवाल सादर केला.ज्यामध्ये शिर्ला ग्रामपंचायतचे सरपंच अर्चना सुधाकर शिंदे या मालमत्ता क्रमांक ३०५३ / १३० मध्ये राहत नसून त्या मालमत्ता क्रमांक १४२१ मध्ये राहतात. ज्याचे कायदेशीर क्षेत्रफळ १०८९ असून , प्रत्यक्ष मोका पाहणी केली असता , शिर्ला ग्रामपंचायत सरपंच अर्चना शिंदे यांनी १८७ चौरस फूट शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचे नमूद केले. त्यावरून शिर्ला ग्रामपंचायत सरपंच सदस्य अर्चना सुधाकर शिंदे यांना या पदावरून अकोला जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी अपात्र घोषित केले होते. यानंतर अमरावती आयुक्त यांनीसुद्धा जिल्हाधिकारी यांचा अपात्रतेचा आदेश कायम ठेवला होता. परंतु या दोन्ही आदेशाच्या विरोधात अर्चना शिंदे यांनी उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाकडे दाद मागितली होती. गुरुवारी एकाच दिवशी या प्रकरणाची सुनावणी घेत उच्च न्यायालयाने सरपंच यांनी कोणत्या जागेवर अतिक्रमण केले याबाबत स्पष्टता नसल्याने एमजीपीच्या कलम ४ (१) (३) अंतर्गत गैरअर्जदार अनंत बगाडे यांचा अर्ज खारीज केला. यामुळे सौ. अर्चना शिंदे या शिर्ला सरपंच या पदावर कायम राहिले असून, उच्च न्यायालयाने एकाच दिवशी या सर्व प्रकरणावी सुनावणी घेऊन प्रकरण निकाली काढले आहे. सरपंच सौ.अर्चना शिंदे यांच्या वतीने सीनियर ड. समीर सोहनी व ड. सुकुत सोहनी यांनी काम पाहिले.

## वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनाचा ग्राहक पंचायतने घेतला वसा

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** ग्राहक पंचायत, भद्रावती यांच्या साप्ताहिक बैठकीत दि.०३/०८/२०२२ रोजी ठपर्यावरण विषयकठ एक महत्वाचा निणर्य घेण्यात आला.ग्राहक पंचायतच्या भद्रावती शाखेतील कार्यकारीणी मध्ये एकुन १५ सदस्य ग्राहक पंचायतीचे कार्य करतात आणि मागील तिन वर्षापासुन सर्व सदस्यांचा वाढदिवस ग्राहक पंचायतीचे संपुर्ण सदस्य मिळुन साजरा करण्यात येत आहे. साप्ताहिक बैठकीत दि.०४/०८/२०२२ नंतर ज्या सदस्यांचा वाढदिवस येणार त्या सर्व सदस्यांचे वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा करण्याचा निणर्य घेण्यात आला. सदस्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी किमान १०-१५ झाडे लावण्यात येणार, झाडे अशाच ठिकाणी लावणार ज्या ठिकाणी लावलेल्या झाडांचे संगोपन होणार. अशा पध्दतीने वर्षभरात ग्राहक पंचायत किमान १५०-२२५ वृक्षांची लागवड करून त्याचे संगोपन करेल. या संदर्भात दि. ०४/०८/२०२२ ला वन परिक्षेत्र अधिकारी हरिदास शेंडे यांना पत्र देवुन वृक्षारोपणासाठी लागणारे झाडे उपलब्ध करून द्यावी असे पत्र देण्यात आले. शेंडे यांनी होणाऱ्या उपक्रमाची प्रसंशा केली आणि वन परिक्षेत्र कार्यालय, भद्रावती कडुन वृक्षारोपण उपक्रमात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी पुरुषोत्तम मत्ते, वामन नामपल्लीवार, वसंत वऱ्हाटे, प्रविण रामचंद्र चिमुरकर, सुदर्शन तनगुलवार आणि मोहन मारगोनवार यांची उपस्थिती होती.

## लोकमान्य विद्यालयात टिळक पुण्यतिथी साजरी

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** येथील लोकसेवा मंडळातर्फे संचालित येथील लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात लोकमान्य टिळक यांची १०२ वी पुण्यतिथी नुकतीच साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत गुंडावार होते. तर प्रमुख अतिथी म्हणून लोणारा येथील साई अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनोद गोरंटीवार, प्रसिद्ध कीर्तनकार डॉ. मृण्मयी कुलकर्णी, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. महाकाळकर, शाळा समिती अध्यक्ष उल्हास भास्करवार, लोकसेवा मंडळाचे सहसचिव नामदेवराव कोल्हे, सदस्य संजय पारधे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या आशालता सोनटक्के आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. सर्वप्रथम सरस्वती माता, लोकमान्य टिळक आणि अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून आणि दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी टिळक पुण्यतिथीचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील पहिल्या तीन यशस्वी स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. मृण्मयी कुळकर्णी यांनी आपल्या कीर्तनातून लोकमान्य टिळकांचे चरित्र व कार्य विद्यार्थ्यांसमोर मांडून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. तसेच लोकमान्य टिळकांचे चरित्र सर्वांनी वाचावे असे आवाहन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.विनोद गोरंटीवार, डॉ. महाकाळकर आणि चंद्रकांत गुंडावार यांनी आपल्या भाषणातून लोकमान्य टिळकांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. यावेळी विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या आशालता सोनटक्के यांनी केले. संचालन प्रा. अस्मिता झुलकंटीवार यांनी केले. तर आभार पर्यवेक्षक रुपचंद धारणे यांनी मानले. शिक्षिका प्राजक्ता चिखलीकर यांनी गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, विद्यालयाचे आजी-माजी शिक्षक व नागरिक उपस्थित होते.

## सर्व-धर्म समभाव कला पथकाद्वारे जनजागृती

**सोनेराव गायकवाड**



**लातूर :** अटल भूजल योजनेची सर्वधर्मसमभाव कलापथकाद्वारे जनजागृती मोठ्या उत्साहात करण्यात आली. अटल भूजल योजने बाबत माहिती व प्रसारण मंत्रालयांच्या केंद्रीय संचार ब्युरो ऑफ आऊटरिच अँड कम्युनिकेशन तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा लातूर यांच्या आदेशान्वये सर्वधर्मसमभाव कला मंडळ खंडाळा ता. जि. लातूर यांच्या मार्फत धनेगाव, गाधवड, रामेगाव, दर्जी बोरगाव व निवाडा या गावांमध्ये पाणी जिरवा-पाणी आडवा, भूजल बचतीचे महत्त्व, पाण्याचे महत्व, विहीर पुनर्भरण, ठिबक- तुषार सिंचन, फळबाग लागवड, पाणलोटाचे विविध उपचार पद्धती, भूजल पातळीमध्ये होत असलेली घसरण दरामध्ये सुधारणा करणे, जलसुरक्षा आराखड्यातील विविध विभागांच्या योजनेचा अभिसरणातून होणारी जलसंधारणाची विविध कामे व जल सुरक्षा आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी या विषयावर विविध गीत, पोवाडे यातून मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. भविष्यकाळात पाणीटंचाईचे संकट टंचाईग्रस्त गावांमध्ये येऊ नये यासाठी अटल भूजल योजना मोठ्या प्रमाणात काम करत असून सर्वधर्मसमभाव कलापथकातील सहभागी कलावंत अशोक शिंदे, सुशीला श्रीराम रणदिवे, राहुल खुडे, उत्तम साबळे, इत्यादी कलावंतानी हे अभियान यशस्वी केले. या अभियानामुळे लोकांना पाण्याचे महत्व कळले असून गावातील सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, ग्रामस्थ तसेच कार्यक्रमासाठी बचत गटातील सदस्य, शाळेतील विद्यार्थी, यांचा चांगला प्रतिसाद मिळत असून वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा लातूरचे एस. बी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक कक्षाचे एच. आर. नाईक, एच. पी. पठारे, पी.एम. गोरपल्ले, आर. एन. पठाण, शुभम शिंदे, जिल्हा भागीदार संस्थेचे समाज संघटक, माहिती शिक्षण संवाद तज्ञ यांचे मोठे सहकार्य लाभले.

## मोरगाव भाकरे येथील ई क्लास जमिनीवरील अतिक्रमण काढले

**अभिजीत फंडाट**



**अकोला :** जिल्हा अधिकारी अकोला यांच्या आदेशानुसार, तहसीलदार यांच्या उपस्थितीत ई.क्लासच्या जमीनीवरील अतिक्रमण करूण पेरलेली पिके महसुल विभागाच्या धडक पथकाने निष्कासीत केले, मोरगाव भाकरे व बाखराबाद दोन ते तिन एकर जमीनीवरील काही लोकांनी अतिक्रमण करून पेरणी केली होती. मात्र आज अतिक्रमण हटवा मोहिमेत ही पिके जमीन दोस्त करण्यात आली व तसेच इ. क्लास जमिनीवर तहसीलदार सुनील पाटील यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. व यांच्या मार्गदर्शनाखाली महसुल पथकाने ही कारवाई केली मोरगाव भाकरे येथील सरकारी ई.क्लास गायरान जमिनीवर काही नागरिकांनी अतिक्रमण केले होते सदर चे अतिक्रमण मंडळ अधिकारी कचरे, तलाठी दिपक पाटणकर ग्रामसेविका विद्र्या वाघ, सरपंच उमा ज्ञानेश्वर माळी, उपसरपंच अर्चना गजानन चोपडे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य अशोक भाकरे व ग्रामपंचायत सदस्य पोलिस पाटील दत्तात्रय माळी, उरळ पोलीस स्टेशनचे एपीआय मोरे व सर्व कर्मचारी उपस्थित होते व तसेच सर्व प्रत्रकार अभिजीत फंडाट, गणेश भाकरे पंगज सिरसाठ अशोक भाकरे व तसेच काही गावातील नागरिक हजर होते.

## रानगव्यांच्या हल्ल्यात सुरक्षा रक्षक गंभीर जखमी

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** येथील आयुध निर्माणीतील सुरक्षा रक्षक आपल्या कर्तव्यावर जात असताना रस्त्यावर उभ्या असलेल्या रानगव्यांनी हल्ला केल्याने गंभीर जखमी होण्याची घटना गुरुवारी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास घडली. प्राप्त माहितीनुसार, येथील आयुध निर्माणीतील सुरक्षा रक्षक राकेश रमेश पुल्लकवार(३९) हे गुरुवारी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास रात्र पाळीतील कर्तव्य बजाविण्याकरीता आयुध निर्माणीत जात होते. चांदा चेक पोस्ट येथून आपल्या वाहनाने आयुध निर्माणीकडे जात असताना रस्त्यावर अचानक रानगव्यांचा एक कळप आला. त्या कळपातील रानगव्यांनी राकेश यांच्यावर शिंगांनी हल्ला केला. त्यामुळे त्यांच्या छातीला व डोक्याला जबर मार लागला. हा प्रकार कर्तव्य बजावून घराकडे परत येणा-या एका सहका-याला कळला. लगेच त्याने इतरांना माहिती दिली. राकेश यांना तातडीने आयुध निर्माणीच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार केल्यानंतर त्यांना चंद्रपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे उपचार केल्यानंतर शुक्रवारी सकाळी नागपूर येथील प्लॅटिना रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

## ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने शेती गेली वाहून

**समाधान पाटिल**



**चिखली :** तालुक्यात मौजे पिंपलवाड़ी- शिवार येथिल गट नंबर १०१ मध्ये श्री स्वप्नील प्रल्हाद मुजमुले राहणार देऊळगाव धनगर तालुका चिखली जिल्हा बुलढाणा यांच्या मालकीच्या शेतात पावसाची ढगफुटी होऊन त्यांचे पिकांचे व जमिनींचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे अतिवृष्टि पावसाने हाहाकार माजवत शेतातील पिकांचे प्रचंड नुकसान केलंय तर काही भागात ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने शेतीच वाहून गेली आहे. आधीच भीषण संकटात पिडलेला बळीराजा शेतकरी पुरता हतबल झालेला असताना ऐन पावसाळयात शेतकरी आनंदीत होण्याऐवजी रडकुडींला आलाय. सोयाबीन यांसारख्या पिकांचं अतिवृष्टी ने प्रचंड नुकसान झालंय. वादळाने शेतकऱ्याच्या घराचे छत उडून गेलंय काही शेतकऱ्यांना ईजा झालीय तर झाडांची ही मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून शेतीही भुईसपाट झाली आहे. निसर्गाच्या लहरीपनामुळे हतबल झालेल्या बळीराजा ने सावकाराचे उंबरठे झिजवून पीकंची लागवड केली परंतू ढगफुटीमुळे व अतिवृष्टीमुळे पावसाने बळीराजा हवालदिल झाला आहे. त्यामुळे सरकार आता तरी आमच्या नुकसान झालेल्या पीकांचे पंचनामे करेल आणि काहीतरी आर्थिक मदत करेल आशी भाबडी आशा बळीराजा शेतकरी करतोय. उभ्या जगाचा पोशिंदा बळीराजा शेतकरी पुरता हतबल झालेला असताना लोकप्रतिनिधी सत्तेचा खेळ खेळताना दिसत आहेत. तर दुसरीकडे प्रशासन कागदी घोडे नाचवतय. त्यामुळे मायबाप सरकारने बळीराजा पुरता उध्वस्त होण्याआधीच त्याची अवहेलना थांबवावी अशी आर्त हाक कष्टकरी वर्ग करत आहे.

## विज पडून गुरख्याचा मृत्यू ,एक जखमी

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** नगर पालिका क्षेत्रातील व एकात्मिक बरांज खुल्या कोळसा खाणी लगत असलेल्या चिचोर्डी शेत शिवारात पाळीव जनावरे राखत असलेल्या गुराख्यावर अचानक वीज गर्जनेसह आलेल्या पावसात वीज पडून एका गुरख्याचा मृत्यू तर एक जण जखमी झाल्याची घटना दि.३ ऑगस्टला दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली. संजय काशिनाथ चालखुरे (५५) रा. बरांज मोकासा असे वीज पडून मृत्यू झालेल्या गुराख्याचे नाव असून विकास डाखरे (२२) रा.बरांज मोकासा असे जखमीचे नाव आहे.हे दोघेही चीचोर्डी शेत शिवारात पाळीव जनावरे राखत होती. अचानक झालेल्या वीज गर्जनेच्या पावसात ही घटना घडली.मृत गुरख्याचे प्रेत उत्तरीय तपासणीस ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे.मृतक हा आपल्या आईकडे राहत असून पत्नी सोडचिठ्ठी देऊन गेली.त्यास एक मुलगी असून मागील वर्षी लग्न होऊन आपल्या सासरी आहे.त्याच्या मृत्यूमुळे गावात एकच शोककळा पसरली.

